# महिला व बालकल्याण समिती जिल्हा परिषद गोंदिया दिनांक 17/1/2019 च्या सभेचे कार्यवृत्त

| अ. क्र | सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्याचे नाव | इतर उपस्थितांचे नाव | प्रस्तावित विषय | संक्षिप्त कार्यवृत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 17/1/2019 सकाळी 11.00 | हजेरी रजिष्टर नुसार | हजेरी रजिष्टर नुसार | खालील प्रमाणे | खालील प्रमाणे |

गोंदिया जिल्हा परिषदेची महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक 17/1/2019 रोजी सकाळी 11:00 वाजता मा. श्रीमती लता संजय दोनोडे सभापती महिला व बालकल्याण समिती,जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे कक्षात घेण्यात आली. सदस्य सचिव उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी, कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

**विषय :-क्रमांक** 1 :- मागिल सभेचे कार्यवृत्ताचे वाचन करुन कायम करणे.

**ठराव क्रमांक** 1 :- मागिल सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन श्री तुषार पौनिकर उपमुकाअ (बाक) यांनी सभेचे सदस्य सचिव यांनी केले व कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक** २:- शासन परिपत्रकांचे वाचन करणे.

१) या महिण्यात जिल्हावार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधून नविन अंगणवाडी बांधकाम करणे ,ज्या जुन्या अंगणवाडयामध्ये शौचालये नाहीत त्याठिकाणी शौचालयाची बांधकामे करणे तसेच अंगणवाडी इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करण्याय मान्यता देण्याबाबत महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एबावि-2017/प्रक्र/101(भाग -1) का-6 मंत्रालय मुंबई 8 जानेवारी 2019 चे वाचन करण्यात आले.

२) तसेच मा.आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून प्राप्त योजनाचे तांत्रीक मंजूरी क्रमांक मबाविआ/तांमा/का-6/गोजिप/18-19 2019 दि 1/1/2019 चे वाचन करण्यात आले.

**विषय क्रमांक** 3:- सन 2018-19 च्या योजनाच्या लाभार्थ्यांची निवड करुन मिळणे बाबत.

**ठराव क्रमांक** 3 - सन 2018-19 च्या योजनाच्या दोन चाकी लेडीज सायकल SCP,TSP तसेच OTSP लाभार्थ्यांच्या नावाचे वाचन करुन निवड करण्यात आले. तसेच पिकोफॉल शिलाई SCP,OTSP च्या लाभार्थ्यांचे नावाचे वाचन करुन निवड करण्यात आले तसेच संगणक प्रशिक्षणाकरिता SCP,TSP OTSP लाभार्थ्यांचे नावाचे वाचन करुन निवड करण्यात आले तसेच शिलाई मशीन प्रशिक्षणाकरिता लाभार्थ्यांचे नावाचे वाचन करुन निवड करण्यात आले. तसेच सादय प्रसाधन प्रशिक्षणाकरिता SCP,TSP OTSP लाभार्थ्यांचे नावाचे वाचन करुन निवड करण्यात आले
सदर योजनेसंबधाने शासन निधी तथा जिल्हा निधी मध्ये प्राप्त नियतव्य /तरतूदीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे योजनानिहाय लाभार्थ्यांची निवड तथा लागणारा निधी खालील प्रमाणे आहे.

| अ.क | योजना | बाब | भौतिक इष्टांक /साध्य | | तरतूद | मार्च अखेर शिल्लक | मार्च अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इष्टांक | साध्य | | | |
| 1 | विशेष घटक योजना (scp) | दोन चाकी सायकल | 255 | 209 | 1000000 | 818235 | 181765 |
| 2 | | शिलाई मशिन | 159 | 157 | 1000000 | 989100 | 10900 |
| 3 | | संगणक प्रशिक्षाण | 316 | 132 | 1200000 | 501600 | 698400 |
| 4 | | म./ई टाय प्रशिक्षण | 94 | 92 | 400000 | 389160 | 10840 |
| 5 | | शिवणकाम प्रशिक्षाण | 111 | 62 | 400000 | 222704 | 177296 |
| | एकुण | | 935 | 652 | 4000000 | 2920799 | 1079201 |
| 1 | आदिवासी उपयोजना ( TS )2235-E 347 TX 280001 | दोन चाकी सायकल | 159 | 67 | 625000 | 262305 | 362695 |
| 2 | | शिलाई मशिन | 99 | 97 | 625000 | 611100 | 13900 |
| 3 | | संगणक प्रशिक्षाण | 197 | 194 | 750000 | 737200 | 12800 |
| 4 | | म./ई टाय प्रशिक्षण | 59 | 34 | 250000 | 143820 | 106180 |
| 5 | | शिवणकाम प्रशि. | 69 | 0 | 250000 | 0 | 250000 |
| | एकुण | | 583 | 392 | 2500000 | 1754425 | 745575 |
| 1 | आदिवासी उपयोजना (OTSP ) 2235-E 347 TX 280001 | दोन चाकी सायकल | 40 | 40 | 160500 | 156600 | 3900 |
| 2 | | शिलाई मशिन | 25 | 24 | 160500 | 151200 | 9300 |
| 3 | | संगणक प्रशिक्षाण | 50 | 35 | 192600 | 123000 | 59600 |
| 4 | | म./ई टाय प्रशिक्षण | 15 | 15 | 64200 | 63450 | 750 |
| 5 | | शिवणकाम प्रशि. | 17 | 17 | 64200 | 61064 | 3136 |
| | एकुण | | 148 | 131 | 642000 | 565314 | 76686 |
| 1 | जिल्हानिधी | दोन चाकी सायकल | 382 | 379 | 1500000 | 1483785 | 16215 |
| 2 | | शिलाई मशिन | 395 | 392 | 2500000 | 2469600 | 30400 |
| | एकुण | | 2443 | 1946 | 11142000 | 9193923 | 1948077 |

लाभार्थी निवड यादी या सोबत सलग्न आहे.

निवड केलेल्या लाभार्थ्यांना तात्काळ माहिती देऊन साहित्याचे बिल प्राप्त करुन साहित्याचा लाभ देण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सन 2016-17 तसेच 2017 -18 या वित्तीयवर्षात अजून पर्यंत लाभ न घेतलेल्या लाभार्थ्यांचे नावाचे सभेत वाचन करण्यात यावे जेणे करुन सबंधित लाभार्थ्याला कळवून लवकर लाभ घेण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच सन्मा. सदस्या श्रीमती खुशबू टेंभरे यांचे त्यांचे क्षेत्रातील काही लाभार्थ्यांना अजून पर्यंत शिलाई मशिनची रक्कम त्यांचे खात्यात जमा झाली नसल्याचे सभेत सांगितले.

सन्मा. सदस्या श्रीमती मडावी यांनी जुन्याच पद्धतीने लाभार्थ्यास लाभ देणे योग्य होते DBT पदधतीने लाभार्थ्यास वेळेवर लाभ दिला जात नसल्याची खंत व्यक्त केली

सन्मा. सभापती श्रीमती लता संजय दोनोडे यांनी शासन निर्णयानुसार योजना सुरळीतपणे चालविण्याकरिता व लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळण्याकरिता कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.बालविकास प्रकल्प कार्यालय अर्जुनी मोर येथील अंगणवाडी सेविका श्रीमती वर्षा रोकडे या अंगणवाडी सेविका पदावर कार्यरत असून लग्न झाल्यापासून रजेवर आहेत अंगणवाडीमध्ये त्याची सेवा मिळत नसल्याने त्यांचे घरावर नोटिस चशमाकरुन लावला असल्याची माहिती श्री भोसले बालविकास प्रकल्प अधिकारी गोंदिया-2 यांनी त्यांचे वतीने सन्मा. सदस्या श्रीमती खुशबू टेंभरे यांनी अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती एनप्रेडडीवार हया नेहमीच रजेवर असतात त्याची रजा कशी मंजूर करण्यात येते यावर आक्षेप नोंदविला असता श्री भोसले बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प गोंदिया -2 यांनी श्रीमती एनप्रेडडीवार यांचे हदयरोग शस्त्रक्रिया झाली असल्याने त्यांचे रजा मंजूर करण्यात आलेल्या होत्या. सध्या त्यांचे मुलीचे लग्न असल्याने त्यांची रजा मंजूर करण्यात आलेली असून त्या बिटचा कार्यभार इतर अंगणवाडी पयवेक्षिकाकडे सोपविण्यात आला असल्याची माहिती सभेत दिली.

सन्मा. सदस्य श्रीमती वालदे यांनी बिट मेळावे घेताना सदस्याना विचारले सुद्धा जात नसल्याची तक्रार केली. यावर सन्मा. सभापती श्रीमती लता संजय दोनोडे यांनी अंगणवाडी मधील बिट मेळावे घेतांना त्याक्षेत्रातील सन्मा. सदस्य यांचेकडून दिनांक व वेळ घेऊन मेळावे घेण्यात यावे तसेच राजशिष्टाचाराचे पालन करण्याचे निर्देश दिले.

सन्मा. सदस्या श्रीमती खुशबू टेंभरे यांनी सन 2017-18 मध्ये कुठे कुठे बिट मेळावे घेतले याची माहिती पुढील सभेत दण्याबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी श्री भोसले यांना सुचविले. सन्मा सभापती यांनी प्रकल्प तिरोडा येथील भरती प्रक्रिया अजून पर्यत का झाली नसल्याची विचारना केली असता श्रीमती शहारे वि.अ. यांनी 3 दिवसात यादी प्रसिदध करण्यात येणार असल्याची माहिती दिली. यावर सदस्य सचिव यांनी आपण मागिल सभेतच 3 दिवसात यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची सांगितले होते आताही तेच सांगत असल्याचे म्हटले तसेच दिनांक 20/1/2019 पर्यंत यादी प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले. सन्मा सदस्या श्रीमती मडावी यांनी गरम ताजा आहाराकरिता धान्य पुरवठा होत नसल्याची तक्रार केली असता सदस्य सचिव यांनी या कार्यालयाचे आदेश क्रमांक जिपगो/बाक/डे-3/699/ 2018 दि 14/12/2018 अन्वये तांदुळ क्रमांक जिपगो/बाक/डे-3/700/2018 दि 14/12/2018 अन्वये गहू वाटप करण्यात आल्याची माहिती सभेत दिली.प्रकल्प सडक अर्जूनी येथील अंगणवाडी सेविकाचे तक्रारीचे अनुषंगाने चौकशी झाली किंवा नाही अशी विचारना केली असता विस्तार अधिकारी यांनी चौकशी झाली असून अहवाल अप्राप्त असल्याची माहिती दिली असता सदस्य सचिव यांनी चौकशी अहवाल समिती समोर ठेवण्याबाबत निर्देश दिले. राष्ट्रीय पेयजल मिशन योजनेअंतर्गत अंगणवातील पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

या नंतर सभेसमोर इतर विषय चर्चेला नसल्याने मा.सभापती महोदयाचे परवानगीने श्रीमती शहारे वि.अ. तिरोडा यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्या अधिकारी कर्मचारी यांचे आभार माणून सभा समाप्त करण्यात आली.

( तुषार व्ही पौनिकर )
सदस्य सचिव
महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद गोंदिया

(श्रीमती लता संजय दोनोडे )
अध्यक्ष
महिला व बालकल्याण समिती
जिल्हा परिषद गोंदिया

**प्रतिलीपी, माहितीस्तव सविनय सादर**

१) मा.अध्यक्षा/उपाध्यक्षा/सभापती -------------------------जि.प. गोंदिया यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.श्रीमती लता दोनोडे सभापती, महिला व बालकल्याण समिती जि.प.गोंदिया.
३) मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीस्तव सविनय सादर.
४)मा.श्री------------------------- स्थायी समिती सदस्य जि.प. गोंदिया यांना माहितीस्तव सविनय सादर.
५)मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया.

**प्रत माहितीस्तव समादराने सादर**

१) विभाग प्रमुख् ------------------------------------(सर्व) जिल्हा परिषद गोंदिया

**प्रतिलिपी, महितीस्तव अग्रेषित.**

१) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ,गोंदिया.
२) बालविकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.प्रकल्प --------------------(सर्व )

सदस्य सचिव
महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बाक)
जिल्हा परिषद गोंदिया

**जिल्हा निधी वितरण आदेश**

**महिला व बालकल्याण विभाग**

**जिल्हा परिषद गोंदिया**

**क्रमांक/जिपगों/मवबाक/का-७ /कस/ १४३ / २०१९**

**दिनांक :- ११.०१.२०१८**

संदर्भ :- १. शासन निर्णय- ग्राम विकास विभाग, क्र.झेपीए/२०१३/प्र.क्र.७६/पंरा-१ दि. २४ जानेवारी २०१४.

२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक डीसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दिनांक ५डिसेबर २०१६.

३. महिला व बाल कल्याण समिती सभा दिनांक २३.१०.२०१८ व दिनांक १७.०१.२०१९

उपरोक्त विषयांकित संदर्भाच्या अनुषंगाने, महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद गोंदिया कडून वर्ग ५ ते १२ वी पर्यंत शिकत अससलेल्या विद्यार्थीना मोफत दोन चाकी लेडीज सायकल पुरविणे अनुषंगाने प्रति सायकल दर-३९१५/-रु.,ग्रामिण भागातील शिवणकाम प्रशिक्षण केलेल्या महिला पिकाफॉल शिलाई मशीन पूरविणे अनुषंगाने दर ७०००/- रुपयांचे ९०% अनुदान देणे अंतर्गत संबंधित लाभार्थ्याने साहित्य खरेदी केल्या चे देयके सादर केल्यानंतर त्यांना DBT ने अनुदाना वितरित करणे. करिता खालील शर्ती अटीच्या आधीन राहून अनुदान वितरित करण्यात येत आहे. सदर योजनेचा लाभ सर्वसाधारण वर्गातील कमकुवत असलेले महिला व मुलींना करिता आहे.

**जिल्हा निधी वितरण तक्ता २०१८-१९**

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | लेखाशिर्ष-२२३५- १०१-२१/२ -मोफत दोनचाकी सायकल पुरविणे | | लेखाशिर्ष-२२३५-महिला व बाल कल्याण, १०१-२१/३-कापड शिलाई मशिन/ सौरकंदिल पुरविणे. | | तालुका निहाय दोनचाकी सायकल करिता देय रक्कम | तालुका निहाय पिकाफॉल मशीन करिता देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या | दोन चाकी सायकल दर ३९१५/- प्रमाणे | लाभार्थी संख्या | पिकोफॉल शिलाई मशीन दर/लाभार्थी ७०००/- च्या ९०% प्रमाणे (६३००/-) | | |
| १ | तिरोडा | ४५ | १७६१७५ | ३२ | २०१६०० | १७६१७५ | २०१६०० |
| २ | गोंदिया १ | ४३ | १६८३४५ | ४१ | २५८३०० | १६८३४५ | २५८३०० |
| ३ | गोंदिया २ | ५० | १९५७५० | ४५ | २८३५०० | १९५७५० | २८३५०० |
| ४ | गोरेगांव | ३५ | १३७०२५ | ४४ | २७७२०० | १३७०२५ | २७७२०० |
| ५ | आमगांव | ३८ | १४८७७० | ५१ | ३२१३०० | १४८७७० | ३२१३०० |
| ६ | सडक-अ. | १५ | ५८७२५ | ५६ | ३५२८०० | ५८७२५ | ३५२८०० |
| ७ | अर्जुनी/मोर. | ३७ | १४४८५५ | ४९ | ३०८७०० | १४४८५५ | ३०८७०० |
| ८ | देवरी | ९ | ३५२३५ | १५ | ९४५०० | ३५२३५ | ९४५०० |
| ९ | सालेकसा | १०७ | ४१८९०५ | ५९ | ३७१७०० | ४१८९०५ | ३७१७०० |
| | एकूण | ३७९ | १४८३७८५ | ३९२ | २४६९६०० | १४८३७८५ | २४६९६०० |

**खालील अटी व शर्ती चे पालन करुन दोन चाकी सायकल, पिकोफॉल शिलाई मशीन, करिता लाभार्थी खाती DBT करणे**

१) सदर योजना ही सर्वसाधारण गटातील कमकुवत मुली व महिलां करिता असून लाभार्थी व त्यांचे कुटूंब हे शैचालयाचे वापर करित असल्याचे प्रमाणपत्र घेण्यांत यावे

२) निवड लाभार्थी यादी पंचायत समिती तथा ग्राम पंचायतीच्या सभेत वाचन करुन दाखविण्यात यावे.

३) जिल्हास्तरावरुन निवड केलेल्या लाभार्थ्याचे प्रमाणात बाल विकास प्रकल्प कार्यालयास वरील प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून वेळोवेळी प्राप्त झालेले वित्त नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे.

४) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना निवड यादी प्राप्त होताच यादी मधील लाभार्थ्यांना पत्र देवून त्यांची निवड योजने प्रमाणे साहित्य करिता करण्यांत आली असल्याचे त्वरित आपल्या यंत्रणेद्वारे कळविण्यात यावे.

५) लाभार्थ्याला त्वरित पत्र देवून साहित्य ISI मार्क साहित्य खरेदी करणे सबंधाने कळविणे.जेणे करुन लाभार्थ्याकडून खरेदी केलेल्या साहित्याचे प्रमाणपत्र व साहित्याचे देयक (बिल) वेळेत उपलब्ध होवू शकेल.